दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक ३२२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.१६ फेब्रुवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## पद्मश्री धुडकावणाऱ्या ज्येष्ठ गायिका संध्या मुखर्जी निधन

**कोलकाता : वृत्तसंस्था**

भारतरत्न, गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्यानंतर आणखी एका ज्येष्ठ गायिकेचे निधन झाले आहे. संध्या मुखर्जी उर्फ संध्या मुखोपाध्याय यांचे आज रुग्णालयात उपचार घेत असताना निधन झाले. त्या ९० वर्षांच्या होत्या.

२७ जानेवारी रोजी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आज प्रकृती अधिक खालावली आणि त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. भारत सरकारने यंदा संध्या मुखर्जी यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर केला होता. मात्र हा पुरस्कार स्वीकारण्यास नकार दिल्याने संध्या मुखर्जी या चर्चेत आल्या होत्या.

संध्या मुखर्जी यांना श्वास घेण्यास त्रास होत होता. त्यांची प्रकृती खालावल्याने त्यांना २७ जानेवारी रोजी तातडीने ग्रीन कॉरिडॉरच्या माध्यमातून कोलकाता येथील एसएसकेएम रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तिथे त्यांच्यावर उपचार सुरू होते. दोन्ही फुफ्फुसांमध्ये संसर्ग झाल्याने तसेच ताप आल्याने त्यांची प्रकृती अधिक खालावली आणि त्यातच त्यांचे निधन झाले.

# फडणवीसांच्या काळात २५ हजार कोटींचा घोटाळा : खा.संजय राऊत

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**शिवसेनेचे नेते आणि खासदार संजय राऊत आज शिवसेना भवनात पत्रकार परिषद घेत भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. यावेळी संजय राऊतांनी भाजपवर मोठा घोटाळ्याचा आरोप केला. देवेंद्र फडणवीसांच्या काळात महाआयटीमध्ये २५ हजार कोटींचा सर्वात मोठा घोटाळा झाल्याचा आरोप राऊतांनी केला आहे. हरियणातील एक दूधवाला एस.नरवालकडे सात हजार कोटींची संपत्ती आहे. त्याला फडणवीस सरकारच्या काळात मुख्यमंत्री निवासस्थ-ानातही मुक्तद्वार प्रवेश होता. त्याच्याकडच्या संपत्तीत मधील साडेतीन हजार कोटी रुपये हे महाराष्ट्रातून गेल होते, अशा शब्दात शिवसेना नेते, खासदार संजय राऊत यांनी भारतीय जनता पक्षावर घणाघाती हल्ला चढवला. ही सर्व माहिती पंतप्रधान व गृहमंत्र्यांना पत्र लिहून देणार आहे. त्या नंतरही तपास नाही झाला, तर पुन्हा पत्रकार परिषद घेईन असा इशारा ही त्यांनी दिला. राऊत यांच्या आरोपानंतर भाजपा-शिवसेना नेत्यांमध्ये आरोप प्रत्यारोपाचे राजकारण चांगलेच तापले आहे.**

महाराष्ट्र, झारखंड आणि बंगाल ही तीन राज्य सरकारने पाडण्यासाठी ईडी, सीबीआयचा वापर करण्यात येतो, असे सांगून राऊत म्हणाले की वीस दिवसांपूर्वी माझ्याकडे भाजपाचे काही नेते आले होते.

तुम्ही सरकार पाडण्यासाठी मदत करा नाहीतर तुरुंगात जावे लागेल, अशा धमक्या मला दिल्या. त्यांना मी स्पष्ट शब्दात नकार दिला. तेंव्हा तीन दिवसांनी माझ्या नजीकच्या लोकावंर धाडी पडू लागल्या असे सांगून राऊत म्हणाले की पवार साहेबांच्या घरातील मुलींवर बहिणींवरही अशाच धाडी पडल्या. भावना गवळी, आनंद अडसूळ यांच्या सह अनिल परब यांच्या विरोधातही अशाच कारवाया केल्या जात आहेत ही सारी प्रकरणे खोटी आहेत.

भाजपा नेते किरीट सोमय्या यांचा उल्लेख दलाल अशा शब्दात सेनास्टाईल करून राऊत म्हणाले की पीएमसी बँकेच्या घोटाळ्याचा प्रमुख सूत्रधार राकेश वाधवान याला ब्लॅकमेल करून सोमय्यांनी ८० ते शंभर कोटी रुपये रोख तर घेतलेच. पण एक फ्रंटमॅन देवेन्द्र लघानी याला पुढे करून सोमय्या यांनी वाधवाच्या बांधकाम कंपनीकडून करोडो रुपयांच्या वसई येथील जमिनी साडे चार कोटी व सात कोटींना घेतल्या. आता वसईत निकॉन फेज वन व टू असा चारशे कोटींचा प्रकल्प सुरु असून नील सोमय्या हा किरीटचा मुलगा त्यात संचालक आहे. यांनी पीएमसी बँके घोटाळ्याचा थेट पैसा घेतला आहे त्याची चौकशी ईडीने करावी असे आव्हानही राऊत यांनी दिले.



किरीट सोमय्या हा माणूस मराठीचा द्वेष करतो. या सोमय्याने मुंबईतील शाळांमध्ये मराठी सक्ती केल्यानंतर कोर्टाचे दरवाजे ठोठावले होते. महाराष्ट्रात मराठी सक्ती नको म्हणून हा माणूस पुढे आला होता आणि हाच माणूस भाजपचा प्रमुख नेता आहे. आधी याचे थोबाड बंद करा. मराठीचा द्वेष करणाऱ्या या माणसाकडून अजून काय अपेक्षा करणार, अशी संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेत केली.

मला गोळ्या घाला वा तुरुंगात टाका, हा महाराष्ट्र आहे, तुम्ही शिवसेनेशी पंगा घेत आहात असा इशारा देऊन राऊत म्हणाले की, काहीही झाले तरी ठाकरे सरकार अजिबात पडणार नाही. १७० आमदारांचे बहुमत आमच्याकडे आहे. पण २०२४ ला तुमचे दिल्लीतील सरकार पडणार आहे नंतर काय होईल, तुम्ही कुठे जाल असाही इशारा त्यांनी भाजपा नेत्यांना दिला.

फडणवीस सरकाच्या कार्यकाळात महाआयटी या संस्थेत पंचवीस हजार कोटींचा घोटाळा झाला. त्यातील अमोल काळे हा कोण आहे, त्याला कुठे लपवून ठेवले आहे असेही सवाल राऊत यांनी केले. ते म्हणाले की हा महाराष्ट्र आहे. ही शिवसेना आहे. बाळासाहेब ठाकरेंनी आम्हाला गुढगे टेकण्याची शिवकवण कधीही दिली नाही. तू काही पाप केले नाहीस , मग कुणाच्या बापाला घाबरू नको असे ठाकरेंचे सांगणे असे सांगून राऊत म्हणाले की पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरेंनी सोमय्याच्या निकॉन प्रकल्पाच्या पर्यावरण तपासण्या कराव्यात महाराष्ट्र आर्थिक गुन्हे शाखेने सोमय्या पीएमसी घोटाळ्यात अटक करावी. मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालावे असेही राऊत म्हणाले.

ते असेही म्हणाले की ईडी कडे सारी कागदपत्रे गेले तीन महिने पाठवली आहेत पण आमच्या वीस वर्षांपूर्वीच्या जमीन खरेदी साठी ८० वर्षाच्या म्हाताऱ्यांना तरूण लहान मुलांना ईडीवाले उचलून आणतात याबद्दल त्यांनी संताप व्यक्त केला.

### ... तर मी राजकारण सोडेन

ईडीच्या धाडींची माहिती मुलुंडमधल्या दलालाला सर्वात आधी कशी काय मिळते, असा सवाल संजय राऊतांनी उपस्थित केला. ठाकरे कुटुंबानं अलिबागमध्ये कोरलाईत १९ बंगले बांधले आहेत. ती बेनामी संपत्ती असल्याचा दावा मुलुंडमधल्या दलालानं केला आहे. कुठे आहेत १९ बंगले? चला आपण त्या बंगल्यात आपण पिकनिकला जाऊ, असं आव्हान राऊतांनी दिलं.माझे स्पष्ट आणि थेट आव्हान आहे. आपण चार बसेस करू आणि त्या १९ बंगल्यात पिकनिकला जाऊ. तिथे ठाकरे कुटुंबाचे १९ बंगले दिसले तर मी राजकारण सोडेन आणि बंगले तिथे नसतील तर मी त्याला जोड्याने मारेन.

## कोलाड परिसरात ३५ वर्षीय महिलेचा खून ; सहा तासात आरोपींच्या मुसक्या आवळल्या

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यातील कोलाड पासून पाच किलोमीटर अंतरावर असणाऱ्या मढाली(पुगाव ) आदिवासी वाडीतील ता. रोहा एका ३५ वर्षीय महिलेचा तीक्ष्ण हत्याराने मांडीवर पोटावर, गळ्यावर, जखमा करून त्या महिलेवर तीक्ष्ण हत्याराने वार करुन तिचा निर्दयपणे खून करण्यात आल्याची घटना घडली होती.

या घटनेची तत्काळ दखल घेऊन कोलाड पोलीस स्टेशनचे कार्यतत्पर व कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अंमलदार उपनिरीक्षक ए,एल् घायवट कोलाड पोलिसांनी तीन पथके तयार करून आरोपीस सहा तासाच्या आत पकडून आरोपींच्या मुसक्या आवळल्याने कोलाड पोलिसांचे जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की कोलाड पासून पाच किलोमीटरवर असणाऱ्या मढाळी पुगाव आदिवासी वाडीतील मयत रेवती नितीन पवार वय ३५ वर्षे या महिलेची दि.१४ फेब्रुवारी रोजी ६ वाजण्याच्या सुमारास प्रेत मिळाले होते सदर ही महिला मढाळी( पुगाव) आदिवासी वाडी येथे राहत होती वरील १४ फेब्रुवारी रोजी शौचास जाते असे सांगून घरात आईला सांगून गेली ती घरी आलीच नाही इतरत्र शोध घेतला असता सदर महिलेचे प्रेत मढाली गावच्या हद्दीत आढळेल सदर महिलेची धारदार हत्याराने मांडीवर पोटावर व छातीवर तीक्ष्ण हत्याराने गंभीर दुखापत करून जीवे ठार केले होते

सदर घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी अधिकारी रोहा विभाग श्री सूर्यवंशी, पाली पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी काईंगडे यांनी तसेच कोलाड पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री सुभाष जाधव यांनी तत्काळ घटनास्थळी भेट घेऊन सदर घटना स्थळाची पाहणी केली


सदर घटना घडल्यानंतर पोलिस यंत्रणा जोमाने कामाला लागली. पोलीस यंत्रणेची तीन पथके तयार करुन सदर महिला बाबत माहिती

.../२

## मुंबई-पुणे एक्सप्रेसवर सहा वाहनांचा विचित्र अपघात ; चौघांचा जागीच मृत्यू

**दै.रायगड नगरी । खोपोली**

मुंबई - पुणे एक्सप्रेस वे वर भीषण अपघात झाला आहे. सहा गाड्या एकमेकांना धडकल्याने विचित्र अपघात झाला आहे. या अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. पुण्यावरून मुंबईला जाणाऱ्या लेनवरील खोपोली जवळ हा भीषण अपघात झाला. हा अप-घात इतका भीषण होता की, चार जणांचा जागीच मुत्यू झाला तर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत आणि पाच किरकोळ जखमी झाले आहेत.



जखमींना पनवेलच्या एमजीएम रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनास्थळी महाराष्ट्र सुरक्षा दल ,देवदूत रेस्क्यू टीम आणि खोपोली, खंडाळा, महामार्ग पोलीस दाखल झाले आहेत. या अपघातामुळे वाहतूक विस्कळीत झाली.

एकूण सहा गाड्यांमध्ये हा अपघात झाला आहे. यामध्ये दोन कंटेनर, एक वेन्यू कार, एक ट्रक, एक आयशर टेम्पो आणि एका स्विफ्ट गाडीचा समावेश आहे. या अपघातात वेन्यू कारचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे. कंटेनरचा ब्रेक फेल झाल्याने हा अपघात झाला असावा असा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात येत आहे. मात्र, अद्याप या अपघाताचे नेमके कारण समोर येऊ शकलेले नाही.

या अपघातात गौरव खरात वय-३६, सौरभ तुळसे वय-३२, सिद्धार्थ राजगुरू वय-३१, मयूर दयानंद कदम, तुळजापूर हे मयत झाले आहेत.

## संक्षिप्त...

### राज ठाकरे यांना फक्त 'मराठी हृदयसम्राट' हीच उपाधी लावा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नावापुढे केवळ 'मराठी हृदयसम्राट' हीच उपाधी लावावी, असे आदेश मनसेने कार्यकर्त्यांना दिले आहेत. राज ठाकरे यांच्या नावापुढे सध्या प्रचलित असलेल्या या उपाधी व्यतिरिक्त इतर नवीन कोणतीही उपाधी लावण्याचा उद्योग करू नये. या सूचनेचे तंतोतंत पालन व्हावे, अशी विनंती कार्यकर्त्यांना करण्यात आली आहे.

मनसेच्या मध्यवर्ती कार्यालयाने राज्यातील सर्व पदाधिकारी, तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सैनिकांसाठी एक निवेदन जारी करण्यात आले. मनसेने या निवेदनात म्हटले आहे की, 'महाराष्ट्रातील तमाम मराठी जनतेच्या हृदयात सर्वोच्च स्थान असलेले महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नावापुढे सध्या प्रचलित असलेल्या उपाधी व्यतिरिक्त (म्हणजे मराठी हृदयसम्राट व्यतिरिक्त) इतर नवीन कोणतीही उपाधी लावण्याचा उद्योग करू नये. कृपया या सूचनेचे तंतोतंत पालन व्हावे ही नम्र विनंती.' मनसेने राज ठाकरे यांच्या नावापुढे फक्त 'मराठी हृदयसम्राट' हीच उपाधी लावण्यात यावी, असा आदेश आपल्या कार्यकर्त्यांना आणि पदाधिकाऱ्यांना दिला आहे.

## गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सिडको नवीन गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करणार असल्याच्या अफवांवर विश्वास न ठेवण्याचे सिडकोचे आवाहन

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

सिडको महामंडळातर्फे येत्या गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर नवीन गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात येणार असल्याचे काही वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेले वृत्त हे निराधार असून, अशाप्रकारच्या अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन सिडकोकडून करण्यात आले आहे. केवळ सिडकोद्वारे प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या अधिकृत माहितीवरच याबाबत नागरिकांनी विश्वास ठेवावा, असे सिडकोकडून कळविण्यात येत आहे.




सिडकोकडून नुकताच २६ जानेवारी २०२२ रोजी नव्या गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात आला असून या योजनेंतर्गत नवी मुंबईतील वेगाने विकसित होत असलेल्या तळोजा नोडमध्ये ५,७३० घरे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. मुंबई-पुणे महामार्ग, रेल्वे आणि सिडकोचा मेट्रो प्रकल्प, यांमुळे या नोडला उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे. एकूण ५,७३० घरांपैकी १,५२४ घरे ही प्रधानमंत्री आवास

.../२

## वीर वाजेकरशेठ प्रेरणादायी व आदर्श व्यक्तिमत्व : आ.बाळाराम पाटील

**दै.रायगड नगरी । उरण**

वीर वाजेकरशेठ हे न्यायी होते. श्वासाच्या शेवटपर्यंत ते जनतेसाठी लढले. अन्यायाच्या विरोधात त्यांनी नेहमी आवाज उठवीला. त्यांनी आयुष्यात कोणतेही पक्षभेद केला नाही. प्रत्येक राजकीय पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते त्यांच्याकडे येत होते. त्यांनी कोणताही भेदभाव न करता सर्वांची कामे केली. त्यांची न्यायदानाची पद्धत सुद्धा उत्कृष्ट होती. अनेक नागरिकांची त्यांनी कामे केली. त्यांनी केलेल्या कार्याची त्यांनी कोठेही गाजावाजा केला नाही. त्यामुळे अशी निस्वार्थी, निपक्षपाती व्यक्तीचे कार्य व विचार सर्वांसाठी आदर्श व प्रेरणादायी असल्याचे मत शिक्षक मतदार संघाचे आमदार बाळाराम पाटील यांनी व्यक्त केले.



श्रमजीवी जनतेचे नेते, उरणचे भाग्यविधाते स्वर्गीय तुकाराम हरी वाजेकर यांची ४१ वी पुण्यतिथी मंगळवार दि १५/२/२०२२ रोजी सकाळी १० वाजता उरण पेठा मिठागर कामगार संघ कार्यालय कोटनाका उरण शहर येथे उरण पेठा मिठागर कामगार संघटना व उरण पेठा मीठ उत्पादक मंडळ यांच्या माध्यमातून साजरी करण्यात आली. यावेळी आमदार बाळाराम पाटील बोलत होते यावेळी स्वर्गीय तुकाराम वाजेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून बाळाराम पाटील यांनी अभिवादन केले. पुण्यतिथी निमित्त मत व्यक्त करताना सर्वांनी वीर वाजेकर यांच्या कार्याचे समरण करत वाटचाल करावी असे आवाहन त्यांनी केले. सदर पाहुणे वर्गाचे स्वागत मुकुंद पाटील तर प्रास्तविक महादेव बंडा यांनी केले. पुण्यतिथी

.../२

## पालीकर जनतेला अपेक्षित विकास शेकाप राष्ट्रवादी आघाडी करून दाखवेल: खा. सुनील तटकरे



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

पाली नगरपंचायतीत जनतेने शेकाप राष्ट्रवादी आघाडीवर विश्वास ठेवून सत्तेत संधी दिली. जनतेचा विश्वास सार्थकी ठरविण्यासाठी पाली नगरसेवकांनी विकासकामांचा आराखडा काढून विकासकामांना सुरुवात करावी , पालीकर जनतेला अपेक्षित विकास शेकाप राष्ट्रवादी आघाडी करून दाखवेल: असा विश्वास खा. सुनिल तटकरे यांनी व्यक्त केला.

पालीकर जनतेने दाखविलेला विश्वास सार्थकी ठरवू अशी ग्वाही खा.सुनिल तटकरे यांनी दिली. सुधागड तालुक्यातील प्रतिष्ठेच्या पाली नगरपंचायतीवर राष्ट्रवादी व शेकाप व आघाडीचा झेंडा फडकल्यानंतर खासदार सुनील तटकरे व आमदार अनिकेत तटकरे यांच्या नेतृत्वाखाली पाली येथील राष्ट्रवादीच्या कार्यालयात पहिली विशेष बैठक संपन्न झाली. यावेळी खासदार सुनील तटकरे यांनी नवनिर्वाचित पाली नगरपंचायतीच्या राष्ट्रवादीच्या पहिल्या नगराध्यक्षा गीता पालरेचा, शेकापचे उपनगराध्यक्ष आरिफ मनियार, तसेच राष्ट्रवादी व शेकाप आघाडीचे नगरसेवक व नगरसेविका यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व सर्व पालीकरांचे तटकरे यांनी मनापासून आभार मानले. यावेळी खासदार सुनील तटकरे म्हणाले की, नवनिर्वाचित पाली नगरपंचायतीच्या निवडणुकीत एक वेगळीच रंगत पाहायला मिळाली.

या निवडणुकीत विशेष करून पाली शहरातील तरुणाईने, व्यापारी मित्रांनी व सर्व समाजाने अत्यंत योग्य पद्धतीने निर्णय घेत पाली नगरपंचायतीचे सूत्रे आघाडीच्या हातात देऊन योग्य परीने निवड केली असल्यामुळे आता अपेक्षापूर्तीची जबाबदारी आपल्या सर्वांवर आली असून दीर्घकाळ रखडलेली पाली शहरातील विकास कामांना वेग देऊन पालीकरांनी आघाडीवर दाखवलेला एक दृढ विश्वास व पालीकरांनी सेवा करण्याची दिलेल्या संधीचे मनापासून आभार मानून त्यांनी दाखवलेला विश्वास अधिक दृढ करण्याचे काम, कदापि तडा जाणार नाही या पद्धतीचे काम आम्ही सर्वजण समुदाहिक रित्या करू. तसेच आम्ही ठरवले आहे आता येणारा निधी सुधागड व तळा तालुक्यालाच देणार त्यामुळे सर्व नगरसेवकांनी ताबडतोब विकासकामांचा आराखडा काढून विकासकामांना सुरुवात करा आपल्याला नाविन्यपूर्ण गोष्टीसुद्धा पाली शहरात करायचे आहेत पाली शहरातील नागरिकांना अधिकाधिक सुविधा कशा देता येतील याचा विचार करा. कारण

.../२

# लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल कामोठे विद्यालयातील विद्यार्थ्यांची क्रीडा क्षेत्रात उत्तुंग भरारी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे येथील रयत शिक्षण संस्थेच्या 'लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल (सिबीएसई) च्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करून भारतीय संघाला आंतरराष्ट्रीय बॉक्स लंगडी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक पटकावून दिला. या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, कामोठे (सीबीएसई) च्या प्राचार्या अर्चना खाडे- चव्हाण, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक इंग्लिश स्कूल अँन्ड ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे, रायगड विभाग पीआरओ बाळासाहेब कारंडे, क्रीडा शिक्षक सुरज पाटील यांच्यासह पालक उपस्थित होते.

या आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये भारतीय संघाकडून कु. सिद्धार्थ मिश्रा (इ. ७ वीं) व कु. ओम झावरे (इ. ७ वी) हे विद्यार्थी सहभागी होते. त्यांना क्रीडा शिक्षक सुरज पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. ही स्पर्धा २९ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२२ रोजी नेपाळ येथे पार पडली. या स्पर्धेमध्ये भारत, नेपाळ, श्रीलंका, भूतान या ४ देशांचा समावेश होता. यात प्रत्येक देशाचे निवड झालेले १२ खेळाडूनी त्यांच्या देशाचे प्रतिनिधित्व केले.

# संजय गुंजाळ यांची कोकण मराठी साहित्य परिषदेच्या मुरुड-जंजिरा शाखाध्यक्षपदी निवड

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुडमध्ये कोकण मराठी साहित्य परिषदेच्या मुरुड जंजिरा शाखेच्या डॉ.रविंद्र नामजोशी मान्यवरांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत संजय पांडुरंग गुंजाळ यांची मुरुड जंजिरा शाखेच्या शाखाध्यक्षपदी निवड झाल्याने सर्वत्र कौतुक व अभिनंदन व्यक्त केले जात आहे.

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या मुरुड-जंजिरा शाख-ची सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक १५ फेब्रुवारी २०२२ रोजी उत्साहात संपन्न झाली. या सभेमध्ये २०२१ ते २०२४ या वर्षासाठी नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली.यामध्ये शाखाध्यक्षपदी संजय गुंजाळ, उपाध्यक्षपदी उषा खोत,कार्याध्यक्ष अरुण बागडे, सचिव नैनिता कर्णिक, सह-सचिव प्रतिभा मोहिले,खजिनदार श्रीमती प्रतिभा जोशी, उप-खजिनदार उर्मिला नामजोशी, जिल्हा प्रतिनिधी सिद्धेश लखमदे, युवाशक्ती प्रमुख आशिष पाटील यांची सर्वानुमते निवड झाली. सर्व नवनिर्वाचित कार्यकारिणीचे पुष्पगुछ देऊन अभिनंदन करण्यात आले. नवीन कार्यकारिणीच्या उपस्थितीत दिनांक २७ फेब्रुवारी रोजी साजऱ्या केल्या जाणाऱ्या मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमाचे नियोजन यावेळी करण्यात आले. सदर सभा मुरुड जंजिरा नगरपरिषद शाळा क्रमांक ४ येथील सभागृहात पार पडली.शेवटी सचिव नैनिता कर्णिक यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# कर्जत तहसील कार्यालयात संत सेवालाल महाराज यांना अभिवादन

**दै.रायगड नगरी । कर्जत**

क्रांतिसिंह संत सेवालाल महाराज यांची आज दि.१५ फेब्रुवारी रोजी जयंती त्यांना कर्जत तहसील कार्यालयाच्यावतीने अभिवादन करण्यात आले. कर्जत तहसीलदार विक्रम देशमुख यांनी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी नायब तहसीलदार सोपान बाचकर, अव्वल कारकून माणिक सानप आदी सह कर्मचारी उपस्थित होते.

# समाजसेवक दिलीप रामदास शेलार यांच्यासह शेकडो शेकडो जणांनी केलेला शिवसेनेत जाहीर प्रवेश



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे व युवासेना प्रमुख तथा राज्याचे पर्यावरण, पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांच्या कार्यप्रणालीवर प्रेरित होऊन तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली व शहर प्रमुख पनवेल प्रवीण जाधव यांच्या विशेष प्रयत्नाने पनवेल शहर व पनवेल कोळीवाडा येथील समाजसेवक दिलीप रामदास शेलार यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला. यावेळी रायगड जिल्हा सल्लागार रमेश गुडेकर, तालुका संघटक भरत पाटील,विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, महानगरप्रमुख रामदास शेवाळे,महानगर संघटक प्रथमेश सोमण, उपमहानगर प्रमुख दिपक घरत,मा. शहरप्रमुख अच्युत मनोरे,उपशहर प्रमुख अनिल कुरघोडे, युवासेना विधानसभा अधिकारी पराग मोहिते, पुरुष पदाधिकारी आदि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल श्री.रोहिदास रामा संते, वय : ५१ वर्षे, व्यवसाय : शेती, रा.श्री समर्थ कृपा, कोळेगांव, पो.निळजे, ता.कल्याण, जि.ठाणे यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमूद असलेल्या मालकांकडून कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्याार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात खालील नमूद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे : बार्डी, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| श्री.अनिल दत्तात्रेय कडव | ६ | ८ | ०-०८-३० | ०.५६ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**कार्यालयीन पत्ता : मु.उक्रुळ, पो.चिंचवली, ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१**

**सही/-**
**ॲड.जयेश संभाजी म्हसे**
**दिनांक : १५/०२/२०२२**
**मो.नं.९०२८९८२२७७**

## हरविले आहे

श्री.वैभव सहादू शेरकर, रा.लक्ष्मी बिल्डींग, एल-१६, पहिला मजला, रुम नं.२७, भायखळा, मुंबई-४०००२७ यांचे नावे असलेले फ्लॅट नं.१:३ (१०३), पहिला मजला, बी विंग, बिल्डींग नं.डी ४, साई अपार्टमेंट ओनर्स को.ऑ.हौ.सो., प्लॉट नं.२ (६), सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प), ता.पनवेल, जि.रायगड या मिळकतीचे मुळ मालक श्री.सतिष पंढरीनाथ कांबळे आणि सिडको सोबत दिनांक १२/१०/१९९५ रोजी झालेला ॲग्रीमेंट ऑफ सेल आणि सिडकोने दिलेले ॲलॉटमेंट लेटर नं.सिडको/एम.एम./डी आर एस-८७/ओ.पी. ७२३३६ दिनांक २७/०३/१९९५, तसेच दि.१२/१०/१९९५ ची ताबापावती, नकाशा प्लॅन व इतर कागदपत्रे हे घरातून कुठेतरी गहाळ झालेले आहेत. याबाबत खांदेश्वर पोलीस ठाणे मिसिंग रजि नं.०२२६/२०२२ दि.१०/०२/२०२२ रोजी नोंद केली आहे.

सदरचे दस्ताऐवज कोणाला सापडली असल्यास खालील पत्यावर आणून द्यावीत.

**सही/-**
**श्री.वैभव सहादू शेरकर**
**रा.लक्ष्मी बिल्डींग, एल-१६,**
**पहिला मजला, रुम नं.२७,**
**भायखळा, मुंबई-४०००२७**


# मुरुडमध्ये नेत्र तपासणी शिबिर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

भारतीय जनता पक्षातर्फे ज्येष्ठनेते तथा जिल्हा कार्यकारिणी सदस्य जनार्दन सदाशिव तथा आण्णा कंधारे यांच्याहस्ते शिवजयंती निमित्ताने शनिवार दि.१९ व रविवार दि.२० फेब्रुवारी २०२२ रोजी शिवजयंती निमित्ताने ब्लडप्रेशर, शुगर, नेत्रतपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

यावेळी मोफत चष्मे वाटप करण्यात येणार आहे.


## पनवेल महानगरपालिका
### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेवून उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | श्री.विजय लोखंडे अध्यक्ष, पनवेल माता-बाल संगोपन मंडळ, पनवेल | ०१ बदाम | पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल माता-बाल संगोपन, पनवेल येथे डॉक्टर्स पार्किंगचे गेट समोर असल्याने पार्कींगमध्ये जाण्यास अडथळा निर्माण करीत असलेले ०१ भेंडीचे झाड तोडण्याची परवानगी बाबत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सुचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

पमपा/उद्यान/२१२२/प्र.क्र.२६/६२/२०२२
दिनांक : १५/०२/२०२२

**सही/-**
**सहा आयुक्त**
**तथा**
**वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## कोलाड परिसरात ३५ वर्षीय महिलेचा खून

गोळा केली सदर मयत महिला पाच ते सहा वर्षे विभक्त राहत होती नवरा सहा महिन्यापासून कोळशाच्या कामाला गेला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती त्या अनुषंगाने तपास यंत्रणा फिरवून कोलाड पोलिस स्टेशनचे कार्यतत्पर व कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक सुभाष जाधव यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी तीन पथके तयार करुन तपास यंत्रणा जलद गतीने करून सुरू केली असता तर अवघ्या सहा तासातच सदर आरोपी दिनेश भिवा जाधव वय ३८वर्षे रा. पुई आदिवासीवाडी ता. रोहा या आरोपीच्या मुसक्या आवळण्यात कोलाड पोलिसांना यश आले असून कोलाड पोलिसांच्या या कार्यपद्धतीचे संपूर्ण जिल्ह्यात अभिनंदन होत आहे

याबाबत कोलाड पोलिस ठाण्यात गु. र.००९/२०२२भा. द.वि. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक ए.एल, घायवट व कोलाड पोलीस पथक करीत आहेत.

## अफवांवर विश्वास न ठेवण्याचे सिडकोचे आवाहन

योजने अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी आणि उर्वरित ४,२०६ घरे ही सर्वसाधारण प्रवर्गासाठी उपलब्ध आहेत. या योजनेकरिता २४ फेब्रुवारी २०२२ पर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहेत. या योजनेस नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभून आतापर्यंत १० हजाराहून अधिक अर्ज प्राप्त झाले आहेत. अधिकाधिक नागरिकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन सिडकोने केले आहे.

सिडको महामंडळ सातत्याने आपल्या गृहनिर्माण योजनांद्वारे सर्वसामान्य नागरिकांकरिता परवडणाऱ्या दरातील घरे उपलब्ध करून देत असते. आपल्या नव्याने येणाऱ्या गृहनिर्माण योजनांची माहिती सिडकोकडून जाहिरात व अन्य माध्यमांद्वारे अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहचविण्यात येते. यामुळे नागरिकांनी या संदर्भात सिडकोद्वारे प्रसारित करण्यात येणारी प्रसिद्धी पत्रके, सिडकोचे अधिकृत संकेतस्थळ, फेसबुक, युट्यूब आणि ट्विटरवरील सिडकोचे अधिकृत पेज यांद्वारे देण्यात येणाऱ्या माहितीवरच विश्वास ठेवावा, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे. तसेच लवकरच वाणिज्यिक गाळ्यांच्या विक्रीची योजना जाहीर करण्यात येणार असल्याचेही सिडकोकडून कळविण्यात आले आहे.

## वीर वाजेकरशेठ प्रेरणादायी व आदर्श व्यक्तिमत्व : आ.बाळाराम पाटील

निमित्त काँग्रेसचे जेष्ठ नेते जनार्दन भोईर, माजी सरपंच रमाकांत म्हात्रे, शेतकरी कामगार पक्षाचे महिला अध्यक्ष सीमा घरत यांनी आपल्या भावना व्यक्त करत स्वर्गीय वीर वाजेकर(तुकाराम हरी वाजेकर )यांच्या स्मृतीला उजाळा दिला.

यावेळी उरण पेठा मिठागर कामगार संघटनेचे अध्यक्ष बाळकृष्ण पाटील, उरण पेठा मीठ उत्पादक मंडळाचे अध्यक्ष महादेव बंडा, सचिव किशोर घरत, माजी नगराध्यक्ष नितीन पाटील,नयना पाटील, शंकर भोईर, नयन म्हात्रे, दिलीप मुंबईकर, लखपती पाटील, मनोहर पाटील, शांताराम पाटील, नितीन ठाकूर, उद्धव घरत, नानुराम पाटील, के एस पाटील, दिलीप तांडेल, गणेश कडू, गणेश ठाकूर, मच्छिन्द्रनाथ घरत आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी सर्व उपस्थितांचे महादेव बंडा यांनी आभार मानले.

## पालीकर जनतेला अपेक्षित विकास शेकाप राष्ट्रवादी आघाडी करून दाखवेल

जनतेने विश्वास टाकल्यानंतर आपण काय पद्धतीने विकास करतो याकडे सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे. म्हणूनच या श्री बल्लाळेश्वराच्या पावन भूमीत विकास कामांना गती देण्याचे काम आपल्याला करायचे आहे. असा विश्वास खा. तटकरें यांनी दर्शविला. जाहीरनाम्यात दिलेला प्रत्येक शब्द कृतीत उतरवू, जास्तीत जास्त विकासकामे करण्याचे आश्वासन यावेळी खासदार तटकरे यांनी दिले.

यावेळी खासदार सुनील तटकरे, अनिकेत तटकरे, राष्ट्रवादी काँग्रेस माजी जिल्हाध्यक्ष वसंत ओसवाल, शेकापचे जिल्हा परिषद सदस्य सुरेश खैरे, राष्ट्रवादी रायगड जिल्हा युवक अध्यक्ष अंकित साखरे, सुधागड तालुका अध्यक्ष रमेश साळुंखे, ग.रा म्हात्रे, अभिजीत चांदोरकर, साक्षी दिघे, हर्षा चांदोरकर, ललित ठोंबरे, सुनील राऊत, किरण खंडागळे, प्रकाश पालरेचा, परेश वडके,परेश घरत आदींसह राष्ट्रवादी व शेकाप आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत माझे अशिलाने प्रस्ताविक जमीन मालक श्री.भिक्या धाऊ भोईर या जमीन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर जमीन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : मोहो, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| मोहो | ३४/२ | ०-५७-०० | ९.०० |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.श्री.दिपक आर. शेळके**
**डी-३/१, किनारा हौ.सो.बावन बंगलो,**
**ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९८२०७९५६०५**

मा.गोडसे साहेब
ॲड.श्रृती द. शिंदे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
एच.एम.पी.नंबर ०२/२०२१
नि.नं.९/ड
ने.ता.२५/०३/२०२२

सौ.नंदिता करण शक्रु लग्नाअगोदर
रेणुका नारायण पाटील
वय : ३५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मोठे भिंगार, पो.अजिवली, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

श्री.करण सतिश शक्रु
वय : ४० वर्षे, धंदा :
रा.पटेल अपार्टमेंट, सी-२०१, कोन,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

अर्जदार सौ.नंदिता करण शक्रु यांनी तुमच्या विरुद्ध विवाह विच्छेदनाकरिता हिंदू विवाह कायदा कलम १३ (अ) प्रमाणे पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात एच.एम.पी.०२/२०२१ हा अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जाकामी मे.कोर्टाच्या आदेशानुसार तुम्हास बेलिफामार्फत दाव्याकामी हजर राहण्यासाठी सामनेवाला यांना सदर अर्जातील तुमच्या पत्यावर नोटीस पाठविण्यात आली आहे. परंतु सदर जागेवर सध्या तुम्ही राहत नाही व आता कुठे राहत आहेत ते माहित नाही असे बेलिफ रिपोर्ट वरुन दिसत आहे.

तरी तुम्हास कळविण्यात येत आहे की, तुम्हास सदर अर्जामध्ये सामनेवाला म्हणून तुम्हाला पक्षकार करण्यात आले आहे. सदर अर्जाविरुद्ध तुम्हाला तुमचे म्हणणे दाखल करण्याकरिता दि.२५/०३/२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे, सदर अर्जाकामी हजर होवून अर्जाची सुनावणी पुढे सुरू होण्यासाठी या वादीस मदत करावी. तुम्ही तसे न केल्यास तुमच्या विरुद्ध पुढील आदेश होवून मिळणेकरिता अर्जदार तर्फे मे.कोर्टात अर्ज करून तुमच्या विरुद्ध पुढील कार्यवाही करण्यात येईल.

आज दि.१५/०२/२०२२ माझ्या सही शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

श्री.मुजावर सा़ो
ॲड.अरविंद चामले

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.१४८६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२८/०३/२०२२

श्री.नितीन रत्नाकर नायक
वय : ३५ वर्षे, धंदा : नोकरी
दो.रा.फ्लॅट नं.०४, प्लॉट नं.०९, शिवदर्शन प्रेमिसेस
सी.एच.एस., एस.के.एम.रोड, आदई सर्कल जवळ,
सेक्टर नं.११, न्यू पनवेल (प.), ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, प्रस्तुत अर्जदार यांनी मे.कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जदार यांची आई श्रीमती.शकुंतला रत्नाकर नायक ही दि.०९/०९/२०२० रोजी मृत्यू पावली असून ती राहणार : सेक्टर नं.११, नवीन पनवेल, नवी मुंबई येथील कायमचे रहिवासी होते. मृत्यूसमयी त्यांचे नावावर स्वकष्टार्जित खालीलप्रमाणे मिळकत होती व तिचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**१) शॉप नं.२१, तळमजला, गिनी प्लाझा को.ऑप.हौ.सो.लि., सेक्टर नं.०६, प्लॉट नं.डी-१३, नवीन पनवेल, नवी मुंबई**

**२) सदनिका क्र.४, शिवदर्शन सोसायटी, प्लॉट नं.९, सेक्टर ११, नवीन पनवेल आदई सर्कल जवळ, ता.पनवेल, जि.रायगड**

मयत श्रीमती.शकुंतला रत्नाकर नायक यांचे कायदेशीर वारसदार पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्रं. | वारसदाराचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | श्री.नितीन रत्नाकर नायक | ३५ | मुलगा |

वरील प्रमाणे मयत श्रीमती.शकुंतला रत्नाकर नायक यांचा कायदेशीर वारसदार आहे व यांचे शिवाय इतर कोणीही वारसदार नाहीत व नव्हते. प्रस्तुतचा चौकशी अर्ज हेअरशिप ठरवून मिळण्यासाठी मे.कोर्टात दाखल केला आहे. तरी या संदर्भात वारसा संबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार हरकत वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबाबत लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : १५/०२/२०२२
किाण : पनवेल

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

सोनवणे साहेब
ॲड.प्रिया मोरे

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.७२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१७/०३/२०२२

१) श्रीमती.पुष्पलता दिनेश सिंग राठौर
वय : ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.अभय दिनेश सिंग राठौर
वय : २५ वर्षे, धंदा : नोकरी
३) कु.रिचा दिनेश सिंग राठौर
वय : २२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.डी ९६/१:४, सरोवर को.ऑप.हौसिंग
सोसायटी, प्लॉट नं.१३, सेक्टर ६,
कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

वरील अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ व ३ यांचे वडील कै. दिनेश श्री रामसिंग राठौर हे दि.०९/१०/२०२१ रोजी मौधा, लाखरुआ, फारुखाबाद, उत्तर प्रदेश येथे अल्पशा आजाराने मयत झाले. मयत कै.दिनेश श्री रामसिंग राठौर यांचे नांवे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मालमत्तेचे वर्णन**

**१) घर नं.३५५, गाव : पडघे, ता.पनवेल, जि.रायगड**
**मुल्यांकन रु.१३,२४,५१३ (रु.तेरा लाख चोवीस हजार पाचशे तेरा मात्र)**
**२) फ्लॅट नं.डी ९६/१:४, सरोवर को.ऑ.हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.१३, सेक्टर ६, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड**
**मुल्यांकन रु.३,६५,०००/- (रु.तीन लाख पासष्ट हजार मात्र)**
**३) प्लॉट नं.डब्ल्यू-१९४** (W-194), **तळोजा इंडस्ट्रीयल एरिया, गाव पेंधर, ता.पनवेल, जि.रायगड**
**मुल्यांकन रु.५,०१,०००/- (रु.पाच लाख एक हजार मात्र)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसोंच आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१५/०२/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## मा.उपमहापौर विक्रांत पाटील यांनी सोडवली यशश्री सोसायटीची समस्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रभाग १८ मधील यशश्री सोसायटी समोरील गटारावरील स्लीपर्स कुचकामी आणि तुटली होती, रहदारी रस्ता असल्याने जेष्ठ नागरिक लहान मुले आणि नागरिकांची नेहमीच वर्दळ या रस्त्यावर असते.काही स्लीपर्स तुटल्यामुळे दुर्घटना होऊन शारीरिक इजा होण्याची संभावना होती. ही बाब काही जागरूक नागरिकांनी कार्यक्षम नगरसेवक विक्रांत पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली. विक्रांत पाटील यांनी तातडीने पावले उचलत महानगरपालिका अधिकाऱ्यांशी बोलून गटारावरील सर्व स्लीपर्स बदलून घेतले.

## चप्पलच्या मालाची चोरी


**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील नवरंग शू मार्केट यांचे विविध प्रकारचे पादत्राणे, सँडल व इतर साहित्याने भरलेला ९२ हजार रुपये किंमतीचा माल असलेला बॉक्स हा दुकानाबाहेर ठेवला असता अज्ञात चोरट्यांनी सदर बॉक्स पळवून नेल्याने याबाबतची तक्रार मेघजी वाविया यांनी पनवेल शहर पोलिस ठाण्यात केली आहे. त्यानुसार पोलिसांची पथके सदर अज्ञात चोरट्याचा शोध चोहोबाजूस करीत आहेत.

# महाड पूर निवारण कार्यवाहीचा पालकमंत्री आदिती तटकरे यांनी घेतला आढावा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यातील महाड येथे सावित्री नदीला जुलै महिन्यात आलेल्या पूरामुळे मोठ्या प्रमाणात जीवित व वित्त हानी झाली. भविष्यात अशा परिस्थितीमुळे आपतकालीन परिस्थिती निर्माण होऊ नये, तसेच पूर निवारणासाठी सर्वो तोपरी उपाययोजना करण्यासाठी पूरनिवारण समिती, आयआयटी (मुंबई) जलसंपदा विभाग, कोंकण रेल्वे, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, सार्वजनिक बांधकाम या सर्व संबंधित विभागांची संयुक्त बैठक दि. ४ फेब्रुवारी रोजी घेण्यात आली होती. त्या अनुषंगाने केलेल्या कार्याचा प्रगती अहवाल व पूर निवारणासाठीच्या कार्यवाहीची गतिमानता वाढविण्यासाठी आज राज्यमंत्री तथा पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय येथे बैठक आयोजित करण्यात आली होती.



महाड पूर निवारण समितीच्या उपस्थित झालेल्या या बैठकीत खासदार सुनील तटकरे, आमदार भरतशेठ गोगावले, महाड नगराध्यक्षा स्नेहल जगताप, मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव असिमकुमार गुप्ता, रायगड जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ. अमितकुमार सैनी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी किरण पाटील, अतिरिक्त जिल्हाधिकारी अमोल यादव, महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड हे या बैठकीसाठी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री कु. आदिती तटकरे म्हणाल्या की, प्रत्यक्ष कार्यस्थळी प्रगती होण्यासाठी या बैठकीच्या माध्यमातून विहीत कालावधीमध्ये म्हणजे पावसाळ्यापूर्वी सर्व उपाययोजना करणे आवश्यक आहे. या उपाययोजना करण्यासाठी महाड प्रांतअधिकारी यांनी जलसिंचन विभाग, पूरनिवारण समिती, आयआयटी (मुंबई) व कोंकण रेल्वे यांच्यामध्ये समन्वयकाची भूमिका साधावी. सावित्री नदीमधील गाळ तसेच नदी पात्रातील बेटे काढण्याची प्रक्रिया अधिक जलद होणे गरजेचे आहे. तटीय नियमन क्षेत्र म्हणजेच सीआरझेडच्या परवानगीबाबत तातडीने प्रस्ताव सादर करण्यात येईल, असे पालकमंत्री कु. तटकरे यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाच्या अखत्यारित असलेल्या नदी पात्रातील गाळ हातपाटीने काढण्याची प्रक्रिया सुरू करण्यास परवानगी दिल्याबाबत माहिती यावेळी देण्यात आली.

जलसिंचन विभागाच्या तांत्रिक विभागाने आवश्यक त्या यंत्रसामुग्रीची उपलब्धता खाजगी पद्धतीने करण्यात येत असल्याबाबत यावेळी सांगितले. मागील बैठकीच्या अनुषंगाने महाड येथील कोकण रेल्वेच्या पुल परिसरातील भरावामुळे पाण्याच्या पातळीबाबत वस्तुस्थिती अहवाल आयआयटी, मुंबई यांच्याकडून मागविण्यात आला आहे. त्यानुसार जुलै महिन्यात आलेल्या पूराच्या मुख्य कारणामंध्ये या पुलामुळे विशेष प्रभाव नसल्याबाबत सांगितले.

यावेळी खासदार सुनील तटकरे म्हणाले की, सर्व शासकीय यंत्रणा ह्या सावित्री नदी व महाड येथे भविष्यात आपतकालीन परिस्थिती उद्भवू नये यासाठी बहुआयामी प्रयत्न करीत आहेत. सर्व स्तरावरील परवानग्या, प्रत्यक्ष कार्यासाठी करण्यात येणाऱ्या निविदा प्रकीया याबाबत अधिक गतिमानतेन कार्यवाही करण्यात यावी, अशा सूचना संबंधित सर्व शासकीय विभागांना दिल्या.

आपतकालीन व्यवस्थापनासाठी महाड येथे करावयाच्या कार्यवाहीसाठीची कार्यमर्यादा लक्षात घेता, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाने नदीप-त्रातील गाळ काढण्यासाठी नियुक्त केलेल्या संस्थेस जलसंपदा विभागाने कालबद्ध वेळेत कार्य करण्यासाठी विहीत पद्धतीने नियुक्त केल्यास याकामी वेळीची बचत होईल. शासकीय यंत्रणा याबाबत सर्वपातळीवर कार्यरत आहेत, असे मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव असिमकुमार गुप्ता म्हणाले. महाड येथे सावित्री नदीपात्रात करावयाच्या प्रत्यक्ष कार्यास गतिमानता मिळाली असून आवश्यक त्या बाबींची पूर्तता करुन प्रशासकीय यंत्रणा कार्य करेल असा विश्वास व्यक्त करुन महाड पूर निवारण समिती, प्रशासकीय यंत्रणांचे उपस्थित स्थानिकांनी यावेळी आभार मानले.

# उरण नगरपरिषदेचा वार्षिक खर्च ८३ लाख ४४ हजार रुपयांनी वाढला

**दै.रायगड नगरी । उरण**

उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर उनपने बोरी–पाखाडी येथील डंपिंग ग्राऊंडवर कचरा टाकणे बंद केले आहे.यामुळे दररोज साचणारा कचरा सिडकोच्या चाळ येथील ५६ किमी अंतरावर असलेल्या डंपिंग ग्राऊंडवर पोहचवण्याचा वार्षिक खर्च ८३ लाख ४४ हजार रुपयांनी वाढला आहे.या अतिरिक्त वाढलेल्या खर्चामुळे उरण नगरपरिषदेचा कचरा विल्हेवाटीचा खर्च एक कोटी ७४ लाखांवरुन तीन कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे.

१२ आण्याची कोंबडी आणि सवा रुपयाचा मसाला या उक्तीप्रमाणे उनपची स्थिती झाली आहे. उरण नगरपरिषदेला अनेक वर्षांच्या संघर्षानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी बोरी– पाखाडी सर्व्हे नं.१८० येथे एक हेक्टर जागेत डंपिंग ग्राऊंडसाठी जागा दिली होती.या डंपिंग ग्राऊंडवरच उनपमध्ये दररोज साचणारा १३ टन ओला–सुका कचरा टाकला जात होता.

कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी वर्षाकाठी उनप १ कोटी ७४ लाखांपर्यंत खर्च करीत होती. मात्र डंपिंग ग्राऊंडवर कचरा टाकला जात असल्याने पसरणारी दुर्गंधी परिसरातील गावातील रहिवाशांसाठी आरोग्यासाठी बाधक ठरू लागली होती. तसेच डंपिंग ग्राऊंडच्या आसपास असलेली खारफुटी, कांदळवन, जैवविविधता धोक्यात आली होती.डंपिंग ग्राऊंडवर कचरा टाकण्यास बंदी घालण्यात यावी यासाठी हनुमान कोळीवाडा मच्छिमार संस्था आणि काही पर्यावरणवादी संघटनांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. या जनहित याचिकेवर निर्णय देताना उच्च न्यायालयाने डंपिंग ग्राऊंडवर कचरा टाकण्यास बंदी घातली आहे. दरम्यान उरण नगरपरिषदेला कचरा टाकण्यासाठी शासनाने पनवेल तालुक्यातील सिडकोच्या मालकीच्या चाळ गावातील डंपिंग ग्राऊंडवर टाकण्याला संमती दिली आहे. हे डंपिंग ग्राउंड उरण शहरापासुन ५६ किमी अंतरावर आहे. बंदीनंतर दररोज जमा करण्यात येणाऱ्या १३ कचऱ्याची विल्हेवाट लावावी लागते. यापैकी विघटन केलेला ओला–सुका ३ टन कचरा बॉयोगॅस, २ टन कचरा कंपोस्ट खताच्या निर्मितीसाठी तर एक टन रिसाकलिंग केले जाते.


तसेच घरोघरी जाऊन कचरा जमा करणे, बायोगॅस प्लांट चालविणे, कंपोस्टिंग करणे, विलिनीकरण, मटेरियल रिकव्हरी फॅसिलिटी, रस्ते झाडणे आदी विविध कामांवर बंदीपुर्वी वर्षाकाठी एक कोटी ७४ लाख तीन कोटी रुपये खर्च येत होता. बंदीनंतर विघटन करून दररोज उरलेला ७ टन कचरा शहरापासून ५६ किमी अंतरावर असलेल्या सिडकोच्या पनवेल येथील चाळ डंपिंग ग्राऊंडवर टाकण्यासाठी न्यावा लागतो. यासाठी दररोज वाहतुकीसाठी १७ हजार २४७ रुपये तर वर्षाकाठी ६३ लाख खर्च करावा लागत आहे. त्यानंतर कचरा डंपिंगसाठी सिडकोकडून प्रतिटन सुमारे ८०० रुपये आकारले जातात. यावर दररोज ५६०० रुपये तर वर्षाकाठी २० लाख ४४ हजार रुपये खर्च होतात. बंदीनंतर या वाढत्या अतिरिक्त खर्चामुळे उनपला वर्षाकाठी दोन कोटी ९५ लाख म्हणजेच तीन कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे असल्याची माहिती उनपचे कनिष्ठ अभियंता झेड. आर.माने यांनी दिली आहे. आधीच दोन वर्षांपासून कोरोना महामारीमुळे आर्थिक उत्पन्न, निधीवर गदा आली आहे. यामुळे सध्या तरी उनपची अवस्था आमदानी अठ्ठनी खर्चा रुपय्या अशी झाली आहे.



# दिव्यांग, मास्टर्स व ज्युनियर महाराष्ट्र श्री २०२२ राज्य अजिंक्यपद शरीरशौष्ठव स्पर्धा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर येथे महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असोसिएशन आयोजित दिव्यांग, मास्टर्स व ज्युनियर महाराष्ट्र श्री २०२२ राज्य अजिंक्यपद शरीरशौष्ठव स्पर्धेला विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी भेट दिली व विजेत्या स्पर्धकांना चषक प्रदान करून शुभेच्छा दिले.



यावेळी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह इंडियन बॉडीबिल्डर फेडरेशनचे मधुकर तळवलकर, वर्ल्ड बॉडी बिल्डिंग असोसिएशनचे सेक्रेटरी चेतन पाठारे, महाराष्ट्र बॉडीबिल्डींग असोसिएशनचे अध्यक्ष प्रशांत आपटे, वर्ल्ड बॉडीबिल्डिंग असोसिएशनचे लिगल अँडव्हायझर विक्रम रोठे, इंडियन बॉडी बिल्डींग असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी हिरल शहा, महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असोसिएशनचे उपाध्यक्ष राजेश सावंत, सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि बॉडीबिल्डर सुभाष पुजारी तसेच स्पर्धक व प्रेक्षक उपस्थित होते.

मा.गोडसे साहेब

अॅड.हेमा भगत

## जाहीर नोटीस

पनवेल येथील सह दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, पनवेल

चौकशी अर्ज क्र.१२३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२५/०३/२०२२

१) श्री.सविता जालिंदर धिवार उर्फ सविताबाई
वय : वर्षे, धर्म : हिंदू, व्यवसाय : गृहिणी
२) श्री.रमेश जालिंदर धिवार
वय : वर्षे, धर्म : हिंदू, व्यवसाय : नोकरी
अर्जदार क्र.१ व २ रा.सदनिका क्र.४०२,
मिडलॅड को.ऑप.हौ.सोसायटी, प्लॉट नं.२७/३१,
सेक्टर ०६, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्री.अमित जालिंदर धिवार
वय : वर्षे, धर्म : हिंदू, व्यवसाय : नोकरी
सर्व रा.सदनिका क्र.४०३ बी विंग, परिवर्तन सोसायटी,
प्लॉट नं.२७/२८/२९, सेक्टर ६ ए,
कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

| गाव | सदनिकेचे वर्णन | किंमत |
|---|---|---|
| कामोठे | ४०३ बी विंग, परिवर्तन सोसायटी, प्लॉट नं.२७/२८/२९, सेक्टर ६ ए, कामोठे | १,२०,०००/– |

वरील अर्जदार क्र.१ ह्या कै.जालिंदर श्रीपत धिवार यांच्या पत्नी आहेत व अर्जदार क्र.२ व ३ हे त्यांचे मुलगे आहेत. कै.जालिंदर श्रीपत धिवार यांचे निधन दि.१८/०७/२०20 रोजी कामोठे येथे झाले आहे. कै.जालिंदर श्रीपत धिवार यांच्या निधनाची नोंद पनवेल महानगरपालिकेमध्ये केलेली असून पनवेल महानगरपालिकेने कै.जालिंदर श्रीपत धिवार त्यांच्या मृत्यूचा दाखला दिलेला आहे. सदर दाखला अर्जासोबत जोडलेला आहे.

वरील उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळविण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल आणि वारस दाखल्याद्दल कोणाचे हक्क अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल घ्यावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१४/०२/२०२२ रोजी सहीने व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

राव साहेब

अर्जदारतर्फे वकील
अॅड.एस.व्ही.क्षीरसागर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

प्रोबेट अर्ज क्र.१८५५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०३/२०२२

श्री.दिपक मुरलीधर वंगाणी
वय : ५७ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.ए १००१, प्रजापती गौरव, प्लॉट नं.३,
से–२, खाारघर, नवी मुंबई–४१०२१० — अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी अर्जदार यांचे वडील कै.मुरलीधर करमचंद वंगाणी यांचा मृत्यू दि.०९/११/२०११ रोजी अ–१००१ प्रजापती गौरव, से–२, प्लॉट नं.३, खारघर, नवी मुंबई–४१०२१० येथे राहत्या घरी झालेला आहे. तसेच अर्जदार यांच्या आई कै.भाग्यवंती मुरलीधर वंगाणी या सुद्धा दि.२८/०४/२०१८ रोजी मयत झालेल्या आहेत. परंतु कै.मुरलीधर करमचंद वंगाणी यांनी त्यांचे मृत्यूपूर्वी दिनांक १९/०७/२००५ रोजी रजिस्टर्ड मृत्यूपत्र करून ठेवलेले आहे व ते दोन साक्षीदारांच्या हजेरीत तयार केलेले असून विधीपूर्वक निष्प–ादन केलेले आहे. सदरचे मृत्यूपत्र हे अर्जदार यांचे शेवटचे मृत्यूपत्र असून ते या अर्जासोबत अर्जदार यांनी जोडलेले आहे. त्याअर्थी अर्जदार यांनी ते कै.मुरलीधर करमचंद वंगाणी यांनी केलेल्या मृत्यूपत्राबाबत अर्जदारांनी प्रोबेट दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

**सदर मृत्यूपत्रातील नमूद मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.**
**नमूद मिळकतीचा तपशील येणेप्रमाणे**
**मौजे : वाशिवली, ता.खालापूर, जि.रायगड**

| अनु.क्र. | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १ | ५/२८/अ/१/अ | ०.०३.७५ | ३.७५ पै |
| २ | ५/२८/अ/२/अ | १४.७५.०० | १४७.५० पै |
| ३ | ५/२८/अ/३/अ | ०.१४.७५ | १४७.५० पै |
| ४ | १२/४/अ | ०.२५.७० | ०.२६ पै |
| ५ | १२/४ | ०.५१.६० | ०.२६ पै |

सदरहू मिळकती या सदरहू अर्जाचा विषय आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतींबाबत कै.मुरलीधर करमचंद वंगाणी यांनी आपल्या मृत्यूपूर्वी दि.१९/०७/२००५ रोजी रजिस्टर्ड मृत्यूपत्र करून ठेवलेले आहे व ते दोन साक्षीदारांच्या हजेरीत यार केलेले असून विधीपूर्वक निष्पादीत केलेले आहे. तसेच सदरच्या मिळकती ह्या कै.मुरलीधर करमचंद वंगाणी आपला मुलगा श्री.दिपक मुरलीधर वंगाणी यांस मृत्यूपत्राद्वारे दिलेल्या आहेत.

वरील मिळकतींचा लाभ अर्जदार यांस मिळणेकरिता प्रोबेट मिळण्याकामी अर्जदार याने केलेला आहे. याबाबत कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत हरकत सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांकडून कायदेशीर साक्षीपुरावे नोंदवून अर्जदारास प्रोबेट प्रदान करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.१५/२/२०२२ रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

राव साहेब

अर्जदारतर्फे वकील
सौ.तनुजा मोकल

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.८१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०३/२०२२

१) श्रीमती.सुनंदा लक्ष्मण घरत (पत्नी)
वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.५४७, कोपर, घरत आळी,
पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.स्मिता कुंदन मोकल (मुलगी)
वय : २८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घार नं.२८९, न्हावेखाडी, मधला पाडा,
ता.पनवेल, जि.रायगड
३) श्वेता लक्ष्मण घरत
विवाहानंतरचे नाव
सौ.श्वेता कुणाल ठाकूर (मुलगी)
वय : २५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.धुतूम, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी कै.लक्ष्मण काशिनाथ उर्फ काशा घरत, हे मु.कोपर, पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत होते व ते दि.१९/०१/२०२१ रोजी मु.कोपर, पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. त्याअर्थी अर्जदार यांनी ते कै. लक्ष्मण काशिनाथ उर्फ काशा घरत यांचे खालील वर्णन केलेल्या मिळकतीत वारस असलेबाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

कै.लक्ष्मण काशिनाथ उर्फ काशा घरत यांच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : गव्हाण व मौजे : खारकोपर, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | मौजे–गाव | युनिट केस नं. | सर्व्हे / हिस्सा | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | गव्हाण | ७१ | ९८/११ | ०–३–१२ |
| | | | ९८/९ | ०–१–१२ |
| | | | ७०/३ | ०–२०–८ |
| | | | ६८/१ | ०–३४–४ |
| | | | ९०/५ | ०–२–० |
| | | | ६८/३ | ०–१३–१ |
| २ | गव्हाण | ८२८ | ६८/२ | ०–१४–० |
| ३ | खारकोपर | ८ | ७/१० | ०–१५–० |

वरील अर्जदार हे मयत कै.लक्ष्मण काशिनाथ उर्फ काशा घरत, यांचे कायदेशीर वारसदार आाहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर कै.लक्ष्मण काशिनाथ उर्फ काशा घरत यांचे वारस असल्याचे शाबित झाल्यास त्यास वारस दाखला मंजूर करील, याची दखल घ्यावी.

आज दि.१५/२/२०२२ रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

राव साहेब

प्रो.जमा. ६–२५

अर्जदाराचे वकील
अॅड.तुषार एल सोंडकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.४९/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०३/२०२२

१) श्रीमती.दुर्गादेवी श्याम फर्से (पत्नी)
वय : ६६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.ए ५०१, ओमकार आर्केड, रेल्वे स्टेशन जवळ,
सेक्टर १५, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६
२) श्री.राहूल श्याम फर्से (मुलगा)
वय : ४५ वर्षे, धंदा : नोकरी
रा.ए ५०१, ओमकार आर्केड, रेल्वे स्टेशन जवळ,
सेक्टर १५, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६
३) सौ.रश्मी विनायक चव्हाण (मुलगी)
पुर्वाश्रमीची रश्मी श्याम फर्से
वय : ४१ वर्षे, धंदा : नोकरी
रा.३–ए–१०१ एन जी सन सिटी, फेज ३,
ठाकूर गाव, कांदिवली (ईस्ट), मुंबई ४००१०१
४) सौ.स्नेहलक्ष्मी महेश घरत (मुलगी)
पुर्वाश्रमीची स्नेहलक्ष्मी श्याम फर्से
वय : ३७ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फ्लॅट नं.१००१, प्लॉट नं.१,
श्री सिद्धीविनायक महिमा, सेक्टर १९,
आईडीबीआई बँक वर, न्यू पनवेल,
ता.पपनवेल, जि.रायगड ४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी कै.श्याम लक्ष्मणलाल फर्से हे दि.२१/०२/२०२० रोजी रा.फ्लॅट नं. ए ७०५, साई संगम, प्लॉट नं.२१, सेक्टर ०५, उलवे नोड येथे मृत्यू पावले आहेत. तसेच त्यांची आई रत्नाबाई लक्ष्मणलाल फर्से ह्या दि.१९/०६/२००४ रोजी रा.ओंकार आर्केड से.१५ अ नवीन पनवेल येथे मयत झाल्या आहेत.

**मिळकतींचे वर्णन**
**१) सदनिका नं.५०१, पाचवा मजला, ओमकार आर्केड, सेक्टर १५ ए, प्लॉट नं.२४, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड. क्षेत्र ४०० चौ.फूट (कारपेट एरिया)**
**२) सदनिका नं.७०५, सातवा मजला, साई संगम प्लॉट नं.२१, सेक्टर ५, उलवे, ता.पनवेल, जि.रायगड क्षेत्र ३८.७९ बांधीव चौ.मी.+१२.३५ चौ.मी. टेरेस + ६.२२ (कारपेट एरिया)**

कै.श्याम लक्ष्मणलाल फर्से यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख १०/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.मुजावर साहेब कोर्ट

अॅड.जी.व्ही.मुकणे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर पनवेल यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१३८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.३०/०३/२०२२

१) श्रीमती.निशा विरसेन अडसुळ
वय वर्षे : ६८, धंदा : गृहिणी
२) श्री.विनीत विरसेन अडसुळ
वय वर्षे : ३९, धंदा : गृहिणी
अ.क्र.१ व २ रा.फ्लॅट नं.एए/२, कस्तुरी–२ सीएचएस,
प्लॉट नं.४५३, ४५६, तक्का गांव, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
३) सौ.कांचन किरण डोके
पुर्वाश्रमीची कांचन विरसेन अडसुळ
वय वर्षे : ४३, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.१०२, जास्मिन, केसन गार्डन,
रामशेठ ठाकूर शाळेसमोर, प्लॉट नं.५३, सेक्टर २०,
खारघर, रायगड–४१०२१० — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

१) अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील कै. विरसेन महादेव अडसुळ हे दि.२६/०२/२०२१ रोजी फ्लॅट नं.एए/२, कस्तुरी–२ सीएचएस, प्लॉट नं.४५३/४५६, तक्का गांव, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६ येथे मयत झालेले आहेत. तसेच कै.विरसेन महादेव अडसुळ यांचे वडील कै.महादेव लक्ष्मण अडसुळ हे देखील दि.२३/०९/२००९ रोजी मौजे : तरडगांव, ता.फलटण, जि.सातारा या ठिकाणी मयत झालेले आहेत. तसेच कै.विरसेन महादेव अडसुळ यांची आई कै.सरस्वती महादेव अडसुळ या देखील दि.०७/०३/२०१८ रोजी ऊरळी देवाची, सावली होम्स, पुणे या ठिकाणी मयत झालेल्या आहेत. तसेच कै.विरसेन महादेव अडसुळ यांना अर्जदारांशिवाय अन्य कोणीही वारस नाहीत. तसेच कै.विरसेन महादेव अडसुळ यांच्या मालकीचे मौजे : पनवेल येथे खालील वर्णनाची खुद्द मालकीची, नांवे असलेली तसेच प्रत्यक्ष ताबेकब्जातील सदनिका व काही जंगम मिळकत सुद्धा आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

| सदनिका क्र. | क्षेत्र | इमारतीचे नांव व पत्ता | सर्व्हे नं. / प्लॉट नं. |
|---|---|---|---|
| एए १/२ | ८४३ चौ.फुट | कस्तुरी कॉम्प्लेक्स | फायनल प्लॉट नं. ४५३ व ४५६ |

सदर वर नमूद केलेल्या मिळकती या अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील कै.विरसेन महादेव अडसुळ यांच्या व अर्जदार क्र.१ यांच्या सामाईक मालकीची असून त्यांचे हयातीत त्यांनी सदर मिळकती कुणासही गहाणपत्र, दान फरोक्त खत अगर इतर कोणाच्याही हक्कात दिलेल्या नाही.

२) वर नमूद केलेल्या अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील यांच्या मिळकतीबाबत कायदेशीर बाबींकरिता यांस वारस दाखला मिळणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार यांस वारस दाखला मिळणे कायद्याचे दृष्टीने योग्य व उचित आहे. सबब अर्जदार यांनी सदरचा अर्ज वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.विरसन महादेव अडसुळ यांचे वारस असल्याबाबतचा वारस दाखला मिळवून घेण्याकरिता सदरचा अर्ज वारस दाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

३) त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकती ह्या अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील कै.विरसेन महादेव अडसुळ यांचे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावांने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.१४/०२/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## श्रीवर्धनमध्ये दिव्यांगांना आवश्यक साहित्य वाटप शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । तळा**

सहकार्य अपंग कल्याणकारी संस्था रायगड महाराष्ट्र आणि श्री समर्थ दिव्यांग कल्याणकारी संस्था महाड यांच्या सहयोगाने दिव्यांगाना आवश्यक साधन साहित्य वाटपासाठीचे दोन दिवसांचे तपासणी व नोंदणी शिबिर महानगर गॅस लिमिटेड मुंबई यांच्या सी आर एस योजनेतंर्गत व भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (अलिम्को ) यांच्या मदतीने सहकार्य अपंग कल्याणकारी संस्था रायगड महाराष्ट्र आणि श्री सर्मथ दिव्यांग कल्याणकारी संस्था यांच्या सहयोगाने नगरपालिका शाळा क्रमांक १, सरकारी दवाखान्यासमोर, श्रीवर्धन येथे संपन्न झाले.

या शिबिराचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष साईनाथ पवार व सहकार्य अपंग कल्याणकारी संस्था रायगड महाराष्ट्र सचिव शिवाजी पाटील, ए आर अंतुले स्कूलचे संचालक अदिब मल्लाक, डॉ. अबु राऊत गौरीच साळुंखे पी अँड ओ कृष्णा मौर्या यांच्या हस्ते करण्यात आले. श्रीवर्धन प्रांताधिकारी अमित शेडगे, तहसीलदार सचिन गोसावी, अंजुमन हायस्कूलचे चेअरमन अहमद इरकान्शा, श्रीवर्धन नगरपरिषदचे नगराध्यक्ष फैजल हूर्जुक, नगरसेवक अनंत गुरव, सलीम सरखोत, श्रीवर्धन मुस्लिम बज्मचे उपाध्यक्ष सलाम फकी, सोमजाई पतसंस्था संचालक बबन चाचले, समाजसेवक शकील सरखोत, हिदायद जमादार, जलिल बगदादी, जाहिद खलिफे, दिपक कांबळे, विश्वासन नात्ती, नेत्रचिकिसक डॉ.सलिम धलाईड, समद सैकुले, पत्रकार समिर रिसबूड आणि समिर लाड आदी मान्यवरांनी सदिच्छा भेट दिली.

दिव्यांगाना या आवश्यक साधनाचा वापर करुन स्वावलंबी होण्यासाठी मार्गदर्शन केले. श्रीवर्धन तालुक्यातील दिव्यांगाना कोणकोणत्या साहित्याची आवश्यकता आहे याची तपासणी अलिम्कोचे कमलेश यादव, गौरिच सालुके, कृष्णा मोर्य, आणि त्यांच्या टीमने केली या तीन दिवसीय शिबिरामध्ये सुमारे ४०० दिव्यांगाची नोंदणी करण्यात आली आहे.

तसेच हे शिबिर संपन्न करण्यासाठी सहकार्य अपंग कल्याणकारी संस्था रायगड महाराष्ट्रचे सचिव शिवाजी पाटील, सल्लागार सुदाम माळी, म्हसळा, श्री एकता दिव्यांग कल्याणकारी श्रीवर्धन या संस्थेचे अध्यक्ष निलेश नात्ती, कार्याध्यक्ष नवाब कुद्रते, सचिव उदय माळी सहसचिव संतोष शेडगे, सहखजिंदार किसन मेंडदकर उपाध्यक्ष मुईद सरखोत, भरत पवार, सुनिल गायकर, विकास गायकर व राम तवसालकर यांनी अथक प्रयत्न केले. तसेच अशाच प्रकारचे दिव्यांगाना आवश्यक साहित्य वाटपासाठीचे शिबिर २३ व २४ फेब्रुवारी २०२२ रोजी एम जि एम हॉस्पिटल कळंबोली, पनवेल येथे होणार आहे अशी माहिती सहकार्य अपंग कल्याणकारी संस्थाचे सचिव शिवाजी पाटील यांनी दिली.

# पालीतील सरसगड किल्ल्यावर लागला वणवा, वनसंपदा जळून खाक, प्राण्यांचा अधिवास नष्ट

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

पालीतील सरसगड किल्ल्यावर सोमवारी (दि.१४) प्रचंड मोठा मानवनिर्मित वणवा लागला होता. या वणव्यामुळे किल्ल्याचा बहुतांश भाग जळून होरपळला. यामध्ये किल्ल्यावर नव्याने लावलेले रोपे व संवर्धन केलेली झाडे जळून खाक झाली. शिवाय येथील माकडे, वानरे व पक्ष्यांच्या अन्नाचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच त्यांचा अधिवास देखील नष्ट झाला.

गुरुवारी (ता.१०) देखील सरसगडाला वणवा लागला होता. हा वणवा २४ तासांहून अधिक काळ सुरु होता. स्थानिक नागरिक व वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी वणवा विझविण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. यामुळे किमान वणवा मानवी



वस्तीत आला नाही. जे कोणी लोक वणवा लावत आहेत त्यांना शोधून कडक शासन करण्याची गरज आहे. शिवऋण प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष केतन म्हसके यांनी सांगितले. कृत्रीम वणव्यांमुळे संपुर्ण सजिवसृष्टी धोक्यात येते. पर्यावरणाचा-हास होतो. त्यामुळे वणवे रोखण्यासाठी वनविभागाच्या माध्यमातून विविध उपाय व जनजागृती केली जाते. तसेच काही वेळेला विद्यार्थी पथनाट्य सादर करतात. मात्र हे प्रयत्न अपुरे आहेत. या उपयांबरोबरच स्थानिक लोकांना व आदिवासींना वणव्याचे दुष्परीणाम सांगून त्यांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे. प्रामुख्याने वनविभाग, निसर्गप्रेमी व आदिवासी विदयार्थ्यांच्या मदतीने जनजागृती करण्याची गरज आहे. तसेच दृकश्राव्य माध्यमांद्वारे वणव्यांमुळे होणारी हानी सर्वांसमोर आणली गेली पाहिजे. लोकांनी देखील स्वयंस्फूर्तीने वणवे रोखणे व स्वतः लावणार नाही यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. अशी अपेक्षा पर्यावरण प्रेमी व्यक्त करत आहेत.

## उरण शहरातील पक्षांचा आशियानाच उजाडल्याने हजारो किलबिलाट थांबला



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण पोलिस ठाणे आणि तहसिल कार्यालयासमोरील पिंपळाचे झाड अर्ध्यावरुन तोडण्यात आले आहे. त्यामुळे हजारो स्थानिक पक्षांसाठी असलेला आश्रयस्थान, आशियाना उजाडला आहे.

उरणमध्ये वाढत्या शहरीकरणामुळे सिमेंट- कॉंक्रीटच्या जंगलात रुपांतर झाले आहे. सिमेंट- कॉंक्रीटच्या जंगलामुळे शहरातील शेकडो झाडे नाहिशी झाली आहेत. त्यामुळे स्थानिक पक्षांसाठी असलेली आश्रयास्थाने दुर्मिळ झाली आहेत. उरण शहरातील पोलिस ठाणे आणि तहसील कार्यालयाच्या इमारतीसमोरच जुनाट पिंपळाचे झाड आहे. या पिंपळाच्या झाडावर विविध जातींचे हजारो स्थानिक पक्षी संध्याकाळी मुक्कामाला येत होते. दिवसभर अन्नाच्या शोधात निघालेले हजारो पक्षी

संध्याकाळी आपल्या आशियानाकडे परतायचे. त्यामुळे हजारो पक्षांचा एकच कलकलाट ऐकू यायचा. पहाटेही पिंपळाच्या झाडावरून कल्ला करुन दिवसभरासाठी अन्नाच्या शोधार्थ फुर्कन भरारी घ्यायचे. त्यामुळे दिवसभरासाठी पक्षांचा किलबिलाट आपसूकच थांबायचा. त्यामुळे हे पिंपळाचे झाड शहरातील विविध जातींच्या स्थानिक पक्षांसाठी एक प्रकारे आशियानाच ठरला होता. काही दिवसांपूर्वी हजारो पक्षांसाठी आश्रयस्थान असलेल्या आशियानावर सरकारी बाबुनी निर्दयपणे कुऱ्हाड चालविली आहे.पिंपळाचे झाड अर्ध्यावरुन तोडण्यात आले आहे. त्यामुळे शहरातील हजारो पक्षांसाठी असलेले आश्रयस्थान नष्ट झाले आहे. पक्षांसाठी असलेला आशियानाच उजाडण्यात आल्याने मात्र हजारो पक्षांचा किलबिलाट आता थांबला आहे.

## नांदगाव हनुमान मंदिर स्टेट बँक रस्त्यावर खड्डेच खड्डे

### तातडीने खड्डे न बुजविल्यास आंदोलनाच्या पावित्र्यात

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

साळाव-मुरुड रस्त्यावर नांदगाव स्टेट बँक मच्छिमार्केट,खारिकवाडा जयहनुमान मंदिर, बुधवार बाजार, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य असून याकडे संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष दिसून येत असून या रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजविण्यात न आल्यास खारिकवाडा ग्रामस्थ रस्त्यावर उतरून आंदोलन करणार असल्याचे समजते.



गेल्या अनेक महिन्यांपासून साळाव - मुरुड रस्त्यावर नांदगाव स्टेट बँक, मच्छिमार्केट, खारिकवाडा जयहनुमान मंदिर, बुधवार बाजार, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र रस्त्यावर खाच-खळगे व खड्ड्यांमुळे वाहनचालक, प्रवासी, नागरिक व रुग्णांना त्रास सहन करावा लागत आहे.

याकडे सबंधित लोकप्रतिनिधी व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी लक्ष पुरवून रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजविण्यात यावेत व चांगल्या रस्त्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने गाव अध्यक्ष दामोदर राऊत, अरविंद शेडगे, सागर राऊत, शरद कुमरोटकर, शंकर राऊत, विनोद मेस्त्रि, दिपक भणगे, नितेश भणगे, केतन मांदाडकर यांनी केली असून तातडीने खड्डे बुजविण्यात न आल्यास याविरोधात खारिकवाडा ग्रामस्थांच्या वतीने रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याशिवाय पर्याय उरणार नाही व मग याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहिल असे म्हटले आहे.

## परिमंडळ २ मध्ये वर्षभरात १९ पैकी १८ हत्येचे गुन्हे उघडकीस

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई पोलिस आयुक्तालयातील परिमंडळ २ मध्ये जानेवारी ते डिसेंबर २०२१ या वर्षामध्ये हत्येचे १९ गुन्हे दाखल झाले. यापैकी १८ गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे. यातील पनवेल शहर पोलीस ठाण्यातील एक हत्येचा गुन्हा उघडकीस आलेला नाही.

नवी मुंबई पोलिस आयुक्तालयातील परिमंडळ दोन मध्ये पनवेल, खांदेश्वर, कामोठे, पनवेल तालुका, तळोजा, खारघर, कळंबोली, न्हावाशेवा, मोरा, उरण या दहा पोलीस ठाण्याचा समावेश होतो. हत्येच्या १९ गुनहयापैकी १८ गुन्हे उघडकिस आल्याने गुन्हा उघडकिस आणण्याचे प्रमाण ९५ टक्के आहे. तर वर्षभरात या दहा पोलीस ठाण्यात मारहाणीचे एकूण २३८ गुन्हे दाखल झाले. यापैकी २२५ गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसाना यश आले आहे. तर शासकीय नोकरांना दुखापत व मारहाणीचे २८ गुन्हे दाखल झाले. यापैकी सर्वच्या सर्व २८ गुन्हे उघडकीस आले. वर्षभरात गर्दीचे ६९ गुन्हे दाखल करण्यात आले. यात सर्व ६९ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

या आकडेवारीवरून दिवसेंदिवस वाढत्या गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्यामध्ये परिमंडळ दोनमधील पोलिसांना यश येत असल्याचे स्पष्ट होत आहे.

## पाईपलाईनसाठी पेण - खालापूर रस्ता खोदल्याने वाहनधारकांचे जीवन ‘गॅसवर’

### प्रातांधिकारी व तहसील प्रशासनाचे हाताची घडी तोंडावर बोट का?



**दै.रायगड नगरी । खोपोली**

तालुक्यात विकासाच्या नावावर ठिकठिकाणी खोदकाम करण्यात येत असल्याने रस्त्यांची आधीच वाट लागली आहे. त्यात खड्ड्यांमुळे अपघातात वाढत होत असतानाच सावरोली गावाच्या हद्दीत ‘एक्सप्रेस-वे’ एक्सिट समोरील खालापूर - पेण रस्ता महानगर गॅस कंपनीकडून पाईपलाईन टाकण्यासाठी मधोमध खोदण्यात आल्याने अपघाताला आमंत्रण मिळत आहे.

मागील काही महिन्यांपासून खोपोली, खालापूरसह कर्जत तालुक्यात महानगर गॅसची पाईपलाईन टाकण्यात येत आहे. घरोघरी स्वयंपाकाचा गॅस पोहचविण्यासाठी विकासकामे केली जात असल्याचे सांगण्यात येत आहे, पण ठेकेदारांकडून विकासाच्या नावावर तालुक्यातील रस्त्यांचा अक्षरशः बट्ट्याबोळ केला जात असून तालुक्याचे प्रशासकीय प्रमुख मात्र फक्त बघ्यांची भूमिका घेत असल्याचे दिसून येत आहे. या खोदकामामुळे कुणाचा जीव गेल्यावर तहसिलदार जागे होणार का? असा प्रश्न नागरिकांकडून विचारला जात आहे.

महानगर गॅस कंपनीची पाईपलाईन टाकण्याकरीता खालापूर तहसील कार्यालयापासून तर तालुक्यात जागोजागी रस्ते खोदून रस्त्यांवर मोठमोठे खडे पाडण्यात आले असून रस्त्यांची दैनावस्था झाल्याचे चित्र दिसून येत आहे. पाईपलाईन टाकल्यानंतर खड्ड्यांवर भूसभुसीत माती टाकून ठेकेदार आपले अंग झाडत निघून जात असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे. डांबरी रस्ते खोदून त्यात माती टाकल्याने अवजड वाहने गेल्यावर ही माती खचून खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण होते, परिणामी या खड्ड्यात आदळून वाहनांचे अपघात होत असल्याचे प्रवासी वाहनचालकांकडून बोलले जात आहे.

नागरिकांना घरोघरी स्वयंपाकाचा गॅस पोचविण्यासाठी महानगर गॅस कंपनी लिमिटेडद्वारे शहरात पाइपलाईन टाकण्याचे काम केले जात आहे, पण हे करताना सुरक्षा नियमांना पार पायदळी तुडविले जात आहे. विकासाचा अर्थ नागरिकांचा जीव धोक्यात घालणे आहे का? असा सवाल वाहनधारकांकडून विचारला जात आहे.

शहरातील प्रमुख रस्त्यांना समांतर खोदकाम करून पाईपलाईन टाकण्याचे काम मागील काही दिवसांपासून सुरू होते, पण आता तर हद्दच झाली. खोपोली - पेण रस्त्यांवरच खोदकाम करून पाईपलाईन टाकण्यात येत आहे, चांगल्या स्थितीतील या रस्त्यांची अक्षरशः वाट लावण्यात आली असल्याचे दिसून येत आहे.

सावरोली गावाच्या हद्दीत ‘एक्सप्रेस-वे’ एक्सिट समोरील खालापूर - पेण रस्त्यांवर पाईपलाईन टाकताना सुरक्षा नियमांचे पालन न करता काम होत असताना तहसील प्रशासन नक्की तालुक्यात पाहते तरी काय? अपघात होवून जीवितहानी झाल्यावर तहसील प्रशासन लक्ष देणार का?घरोघरी स्वयंपाकाचा गॅस पोचविण्यासाठी महानगर गॅस कंपनी लिमिटेड काम करते आहे की, रस्त्यांवर खड्डे पाडून अपघाताची परिस्थिती निर्माण करण्यासाठी? असा संताप सवाल ग्रामस्थांकडून विचारला जात आहे.

## १७ वर्षीय बेपत्ता मुलीला शहर पोलिसांनी काढले शोधून

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कौटूंबिक वादातून कोणास काही एक न सांगता घराबाहेर पडलेल्या एका १७ वर्षीय अल्पवयिन मुलीस पनवेल शहर पोलिसांच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे शोधून तिच्या आईकडे तिला सुपूर्त केले आहे.

तालुक्यातील काळुंद्रे येथे राहणारी एक १७ वर्षीय मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार तिच्या कुटूंबियांनी पनवेल शहर पोलिस ठाण्यात दिली होती.

त्यानुसार वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक पवार, पोलिस उपनिरीक्षक अभय शिंदे, पोहवा राऊत, पोना परेश म्हात्रे, पोना वायकर,पोना पारासूर, पोना देशमुख, महिला पोलिस कॉन्स्टेबल बनसोडे आदींच्या पथकाने सदर तरूणीचा असलेला मित्र परिवार यांच्याकडे चौकशी केली.

बेपत्ता झालेली मुलगी ही मोबाईल वापरत नव्हती. तिच्या मित्राने दिलेल्या माहितीनुसार तिची एक जवळची मैत्रिण बेलापूर गाव येथे राहत असल्याची माहिती मिळाली. तांत्रिक तपास व इतर माहितीच्या आधारे सदर मुलीच्या घराचा शोध घेतला असता बेपत्ता झालेली मुलगीसुद्धा तेथे आढळून आली. त्यानुसार या पथकाने सदर मुलीस ताब्यात घेऊन पनवेल शहर पोलिस ठाण्यात आणले व तिच्या कुटूंबियांकडे तिला सुपूर्त केले आहे.

## गुंडगे संत रोहिदास नगर येथे चौकात चबुतरा बांधावा ; ग्रामस्थांची मागणी

**दै.रायगड नगरी । संजय गायकवाड**

**कर्जत** : कर्जत नगर परिषद हद्दीतील गुंडगे येथील संत रोहिदास नगर येथे चौकात चबुतरा बांधावा अशी मागणी संत रोहिदास नगर येथील ग्रामस्थांनी कर्जत नगर परिषदेकडे केली आहे.

गुंडगे संत रोहिदास नगर येथे चौकामध्ये संत रोहिदास नगर असा चार बाय तीन फूट चा फलक लावलेला आहे, या ठिकाणी प्रत्येक वर्षी आम्ही ग्रामस्थ संत रोहिदास महाराज यांची जयंती साजरी करीत असतो. सदर चौकामध्ये चार फूट बाय तीन फूट चबुतरा बांधकाम नगरपालिकेने करून द्यावे व सदर चौकात स्ट्रीट लाईट चा पोल लावून त्यावर मरक्यूरी लाईट लावावेत अशी मागणी एका निवेदनाद्वारे संत रोहितदास नगर येथील ग्रामस्थांनी केली आहे. १६ फेब्रुवारी २०२२ रोजी संत रोहिदास महाराज यांची ६४४ वी जयंती आहे त्यापूर्वी हे काम झाले तर बरे विथ अशी विनंती करण्यात आली आहे.

## वाइनची बाटली पडली ६५ हजार रुपयांना

**दै.रायगड नगरी । पनवेल**


ऑनलाईन ऑर्डर केलेली एक वाईनची बाटली महिलेला तब्बल ६५ हजार ११९ रुपयांना पडली आहे. आरोपींविरुद्ध खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खारघर सेक्टर ५ येथील राहणाऱ्या महिलेने गुगल वरून पायना वाईन्स नावाच्या शॉप मधून १ हजार ४०० रुपयांची एक वाईन ऑर्डर केली होती. यावेळी त्यांना समोरील व्यक्तीने व्हाट्सअप वर क्यू आर कोड पाठवला. त्याद्वारे त्यांनी चौदाशे रुपये त्याला पाठवले. यावेळी अर्ध्या तासात ऑर्डर घरी डिलिव्हरी होईल असे सांगण्यात आले. त्यानंतर समोरील क्रमांकावरून त्यांना व्हाट्सअप कॉल आला आणि गुगल प्ले वर रजिस्टर करायचे असल्याचे सांगितले. त्यांनी गुगल प्ले चालू केले व ऑप्शन वर क्लिक करण्यासाठी सांगितले. त्यानंतर युपीआय पिन टाकण्यास सांगितले. यावेळी अठरा हजार ३७३ रुपये त्यांच्या खात्यातून वजा झाले त्यानंतर बोलण्यात गुंतवून पैसे आले नसल्याचे सांगून एकूण ६५ हजार ११९ रुपये महिलेच्या खात्यातून वजा झाले.

## पुलवामा हल्ल्यातील शहीद जवान व लतादीदींना पाली नगरपंचायतीत श्रद्धांजली

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

पुलवामा येथे १४ फेब्रुवारी २०१९ रोजी भारतीय जवांनाच्या ताफ्यावर झालेल्या भ्याड आतंकवादी हल्ल्यात शहीद झालेल्या देशाच्या वीर जवानांना तसेच भारताची गानकोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांना नवनिर्वाचित पाली नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा गीता पालरेचा, उपनगराध्यक्ष आरिफ मणियार, तसेच सर्व नगरसेवक व नगरसेविका यांनी दिनांक १४ फेब्रुवारी रोजी पाली नगर पंचायत कार्यालयात श्रद्धांजली वाहिली.



नगराध्यक्ष गीता पालरेचा यावेळी म्हणाल्या की पुलवामा हल्लूयात शहिद झालेल्या जवान यांच्याबद्दल हृदयात प्रचंड कृतज्ञ भावना आहे. मायभूमीच्या रक्षणासाठी व तिरंग्याच्या सन्मानासाठी प्राण बलिदान देणाऱ्या जवानांना मानाचा सॅल्युट व आदरांजली. तर गाणं कोकिळा लतादीदींनी सुमधुर आवाजात गायलेली गीते देशवासियांच्या हृदयावर अधिराज्य गाजवतात.

देशाची शान आणि संगीत जगताच्या शिरोमणी स्वरकोकिळा लता दीदीच्या निधनाने संगीत जगताची खूप मोठी हानी झाली, त्याबरोबरच एका स्वर युगाचा देखील अंत झाला आहे. त्यांचा आवाज नवपिढीला प्रेरणा देत राहील, त्यांची गीते अजरामर आहेत व ती सतत ऐकली जातील. असे गीता पालरेचा म्हणाल्या . यावेळी आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच पाली नगरपंचायतीचे कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

## दोन लाख ७७ हजार रुपयांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

चॅरिटी ला दान देताना ओटीपी नंबर नसल्याने एका मोबाईलवर फोन केला असता ६९ वर्षे इसमाची दोन लाख ७७ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार खारघरमध्ये उघडकीस आला आहे.

खारघर सेक्टर २० येथील संन्यासी राव वडाली यांना तिला दान करायचे होते त्यांच्या मोबाईलवर ओटीपी नंबर नसल्याने त्यांनी गूगल प मधून एक नंबर मिळवला यावेळी फोन केला असता समोरील इसमाने तो स्टेट बँक इंडिया या बँकेत काम करणारे कर्मचारी असून दीपक कुमार शर्मा असे नाव सांगितले. त्यांनी संन्याशी राव यांना यांनी एनीडेस्क हे प्लिकेशन मोबाईल मध्ये डाऊनलोड करण्यास सांगितले यावेळी त्यांच्या अकाउंट मधून दोन लाख ७७ हजार ४९९ रुपये वजा झाले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी खारघर पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार दिली.